# कार्यालय
# पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर

सिव्हील लाईन, पोलीस आयुक्त नागपूर शहर नियंत्रण कक्षा जवळ,
नागपूर-४४०००१
दुरध्वनी क्रमांक :-

# महाराष्ट्र राज्य पोलीस कल्याण निधी योजना

**( पोलीस कल्याण निधी सुधारित नियमावली-२०१९चे अनुषंगाने )**

**पोलीस कल्याण निधी द्वारे राबविण्यात येणाऱ्या योजना आणि उपक्रम बाबतची**

**✯ माहिती पुस्तीका ✯**

# ◈ अनुक्रमनिका ◈


| अनु.क्रमांक | प्रकरण | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | लक्ष्य आणि उद्योष्टये | १ |
| २. | सदस्यत्व | २ |
| ३. | निधीचा विनियोग | ३ |
| ४. | पुस्तक अनुदान | ४ |
| ५. | वार्षिक शैक्षणिक प्रोत्साहन योजना-दप्तर योजना | ५ |
| ६. | उच्च शिक्षण पदव्युत्तर पदविका व पदवी प्रोत्साहन योजना | ६ |
| ७. | उच्च शिक्षण अनुदान/कर्ज योजना | ७ |
| ८. | एकलव्य योजना/उद्योजकता व कौशल्य विकास योजना | ८-९ |
| ९. | महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत अनुदान व वैद्यकीय अग्रीम योजना | १० |
| १०. | अंत्यविधी व सानुग्रह अनुदान | ११ |
| ११. | समुह वैयक्तिक अपघात विमा योजना | १२ |
| १२. | पोलीस कल्याण निधीतुन शाळा प्रवेश अर्धशुल्क वितरण | १३ |
| १३. | मानव संसाधन शाखे तर्फे समाधान मदत केंद्र/हेल्प लाईन | १४ |
| १४. | पोलीस बॅन्ड व शासकीय वाहन भाडेतत्वावर पुरविणे | १५ |
| १५. | व्यायाम शाळा | १६ |
| १६. | सदभावना विश्राम गृह | १७ |
| १७. | पोलीस कल्याण निधी- पेट्रोल पंप (पो.प्टे.कळमेश्वर) | १८ |
| १८. | महिलांना विशेष पोषण आहार व सुदृढ बालिका अनुदान योजना | १९ |
| १९. | महाराष्ट्र रजा नियम बाबत माहिती | २०-२१ |
| २०. | महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजना | २२-२३ |
| २१. | चित्रांगण | २४ |

# ◈ लक्ष्य आणि उद्दीष्टये ◈

◈

**शा**सनाने गृहविभाग पत्र क्र.पीडब्ल्यूएफ-०३७२/३००३५-पोल-७, दि.२२/२/१९८० अन्ये दिलेल्या मान्यतेनुसार, तसेच शासन पत्र गृह विभाग क्र.संकिर्ण ०४१२/प्र.क्र.२२५/पोल-७, दि.४.५.२०१२ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली १९८० च्या मूळ नियमावलीतील नियमांमध्ये मध्यतवर्ती पोलीस कल्याण निधी समितीच्या प्रत्येक सहामाही बैठकीतील ठरावानुसार झालेल्या सुधारणांचा समावेश करुन, सन २०१५ पासून ते आतापर्यंत वेळोवेळी झालेल्या सर्व सुधारणांचा व कालपरत्वे झालेल्या बदलांचा समावेश करुन महाराष्ट्र पोलीस कल्याण निधीची सुधारित नियमावली-२०१९ तयार करण्यात आली असुन ती प्रसारित करण्यात आलेली आहे.

◈

**मा**नसिक स्वास्थ्याचा देखील पोलीस कल्याण अंतर्गत समावेश असुन, महाराष्ट्र पोलीस कल्याण निधीची पुढील वाटचाल वसाहतींमध्ये हरित व शाश्वत पर्यावरण निर्माण करण्याची, पाल्यांच्या उत्तुंग शिक्षण भरारीसाठी प्रयत्नांची व पोलीस कुटूंबांसाठी संपूर्ण स्वास्थ्य आणि आनंदाची हमी देण्याची आहे.

◈

**काय?** पोलीसांना व त्यांच्या कुटूंबीयांना आर्थिक सहाय्य व समाजिक मदत देण्याकरिता महाराष्ट्र पोलीस विभागाने स्थापन केलेला एक निधी.

**काय?** सदस्यांची वर्गणी, व्यावसायिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, शासन देणगी तसेच सार्वजनिक देणगी यांपासून आलेली रक्कम.

**का?** पोलीसांच्या व त्यांच्या कुटूंबीयांच्या कल्याण, विकास आणि सहाय्यासाठी.

हा निधी केवळ सदस्यांच्या व त्यांच्या कुटूंबीयांच्या कल्याणसाठी सुरु केला आहे. निधीच्या संसाधनांच्या अंतर्गत कल्याणासाठीच्या उपाययोजना चालू करुन त्या राबविणे हा निधीचा मूळ उद्देश आहे. परस्परांच्या सहकार्यामुळे आणि सहाय्यामुळे कल्याणकारी उपक्रम यशस्वी होऊ शकतात. याच कल्याणकारी योजनांचे परिणाम पोलीसांच्या उत्तम कार्यप्रणालीतून दिसून येतात.

# ◈ सदस्यत्व ◈

**पो**लीस विभागातील कर्मचारी व अधिकारी यांचे सदस्यत्व श्रेणीनुसार एक तर सक्तीचे किंवा ऐच्छिक राहते. त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी आपोआप कल्याण निधीचे कायमस्वरुपी सदस्य होतात. पोलीसेत्तर कायमस्वरुपी नेमणूक झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना निधीचे सदस्यत्व ऐच्छिक आहे. तसेच लिपीक वर्गीयांना सुध्दा ऐच्छिक सदस्यत्व आहे.

**पो**लीस कॉन्स्टेबल ते पोलीस महासंचालकांपर्यन्त सगळेच पोलीस कल्याण निधीचे सदस्य आहेत. परंतू आर्थिक मदत आणि योजनांचा लाभ फक्त पोलीस निरीक्षक व त्याखालील पदांसाठी आणि लिपीक वर्गातील सदस्यांसाठी आहे.

सदस्यांची चौमाही वर्गणी दर वर्षाच्या एप्रिल, ऑगस्ट व डिसेंबर महिन्यांत त्यांच्या पगारातून कापली जाते, ही चौमाही वर्गणी २०१७ मध्ये वाढवण्यात आलेली आहे.

**सक्तीचे सदस्यत्व शुल्क.**

| अनु.क्र. | पदनाम | वर्गणी दर (रु.) |
|---|---|---|
| १. | पोलीस महासंचालक/अपर पोलीस महासंचालक | ७५०/- |
| २. | विशेष पोलीस महानिरीक्षक/पोलीस उप महानिरीक्षक/पोलीस अधीक्षक | ६००/- |
| ३. | पोलीस उप अधीक्षक/सहाय्यक पोलीस आयुक्त | ४००/- |
| ४. | पोलीस निरीक्षक/सहाय्यक पोलीस निरीक्षक/पोलीस उप निरीक्षक | २५०/- |
| ५. | सहाय्यक पोलीस उप निरीक्षक ते पोलीस शिपाई | १५०/- |

**वैकल्पिक सदस्यत्व शुल्क(लिपीक)**

| अनु.क्र. | पदनाम | वर्गणी दर (रु.) |
|---|---|---|
| १. | पोलीस महानिरीक्षक यांचे वरिष्ठ उप सहाय्यक (गट अ) | ६००/- |
| २. | पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहाय्यक (गट ब) | ४००/- |
| ३. | प्रशासकीय अधिकारी/वरिष्ठ कार्यालय अधीक्षक/कार्यालय अधीक्षक/लघुलेखक (गट क) | २५०/- |
| ४. | प्रमुख लिपीक/लिपीक कर्मचारी/कार्यालयीन शिपाई व स्वच्छक (गट ड) | १५०/- |

# ◈ निधीचा विनियोग ◈

◈

**पो**लीस कल्याण निधीचा वापर कल्याणाचे विविध उपक्रम चालविण्यासाठी व उत्पन्न अधिक वाढवून त्यांना सुरु ठेवण्यासाठी केला जातो :-

१. वैद्यकीय अग्रीम/कर्ज किंवा अनुदान : ज्या औषधोपचारांचा खर्च शासकीय वैद्यकिय प्रतिपूर्तीने होत नाही अश्यांसाठी.
२. शैक्षणिक मदत/सुविधा पोलीस अधिकारी/कर्मचारी व सदस्य असलेले पोलीस विभागातील इतर शासकीय कर्मचारी यांच्या पाल्यांकरिता.
३. मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना सानुग्रह आणि अत्यंविधी अनुदान.
४. कला, साहित्य, क्रीडा व स्पर्धांसाठी प्रोत्साहन
५. कौशल्य विकासासाठी अनुदान व प्रशिक्षण.
६. सोयीसुविधांचे बांधकाम व त्यांची देखभाल.
७. उपक्रमांतील तज्ञांचे मानधन.
८. शाळेची बस, उद्याने ग्रंथालये, अभ्यासिका, मनोरंजन केंद्र, रेडिओ, टि.व्ही, पाण्याची टाकी व शुध्दीकरण इत्यादी...

◈

पोलीस कल्याण निधी नियमावली नियम क्र.९(१)(के) नुसार पोलीस कल्याण निधी मधील खर्चाच्या वित्तीय प्राधिकारामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे.

| अनु.क्र. | पदनाम | खर्चाचे अधिकार(रु) |
|---|---|---|
| १. | पोलीस अधीक्षक/समादेशक/प्राचार्य/समकक्ष दर्जाचे घटक प्रमुख | ४,००,०००/- |
| २. | वि.पो.म.नि., दर्जाचे परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक/घटक प्रमुख व विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), म.रा.मुंबई | ८,००,०००/- |
| ३. | अपर पोलीस महासंचालक दर्जाचे आयुक्त/पोलीस आयुक्त/संचालक व घटक प्रमुख | १२,००,०००/- |
| ४. | अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) म.राज्य मुंबई | पुर्ण अधिकार |

◈

# ◈ पुस्तक अनुदान ◈

◈

**पो**लीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचे पत्र क्रमांक पोमसं/२८अ/४९३७/मपोकनिस बैठक-पू.अनुदान/४३९(०५)/२०१७, दिनांक ०८/०९/२०१७ अन्वये इयत्ता ५ वी पासुन पूढे शिक्षण घेणाऱ्या पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक दर्जापर्यन्तच्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे पाल्यांकरीता आणि लिपीक वर्गीय सदस्यांसाठी खालील प्रमाणे पुस्तक अनुदान हे घटक कल्याण निधीतून मंजूर करण्याबाबतचे आदेश आहेत.

| अनु.क्र. | शैक्षणिक अभ्यासक्रम | टक्केवारी | अनुदानाचे दर रुपये |
|---|---|---|---|
| १. | इयत्ता ५ वी ते १० वी पर्यन्त | ८५% किंवा प्रमुख ६ विषयांपैकी ३ विषयांमध्ये किमान A-२ श्रेणी | १२५०/- |
| २. | इयत्ता ११ वी ते १२ वी पर्यन्त | ८०% | २५००/- |
| ३. | पदवी /पदव्युत्तर पदवी (कला, वाणिज्य व विज्ञान), LLB, MBA, BBA, BCA, MCA, DBM, B-Ed., M-Ed., CA, BSc-IT, BMS, Hotel Management, Computer Degree & Diploma, ITI, etc. | ७०% | ३७५०/- |
| ४. | अभियांत्रिकी पदविका (Diploma) | ६५% | ३७५०/- |
| ५. | वैद्यकिय पदविका (Diploma) D-Pharm | ६५% | ३७५०/- |
| ६. | अभियांत्रिकी पदविकी पदवी (Degree) BE, पदव्युत्तर पदवी (ME) | ६५% | ८७५०/- |
| ७. | वैद्यकिय /पशुवैद्यकीय पदवी / B Pharm / M Pharm पदवी (Degree) पदव्युत्तर पदवी. | ६५% | १८७५०/- |

◈



# ◈ वार्षिक शैक्षणिक प्रोत्साहन योजना-दप्तर योजना ◈

◈

**पो**लीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचे पत्र क्रमांक पोमसं/२८अ/४९३७/वा.शै.अनुदान/पोशि ते सपोउपनि/वर्ग-ड ते कश्रेलि/९२/२०१७, दि.१८/०५/२०१७ व दि.२७/१०/२०१७ चे परिपत्रकान्वये पोशि ते सपोउपनि, वर्ग-ड तसेच कनिष्ठ श्रेणी लिपीक ते वरिष्ठ श्रेणी लिपीक यांचे इयत्ता ५वी ते १०वी पर्यन्त शिक्षण घेत असलेल्या फक्त दोन मुलींसाठी घटक पोलीस कल्याण निधीतुन प्रत्येकी रु.५००/- वार्षिक शैक्षणिक प्रोत्साहन अनुदान सन २०१६-१७ पासुन लागु करण्यात आले आहे. सदर वार्षिक शैक्षणिक अनुदानाकरिता पोलीस कर्मचारी तसेच मंत्रालयीन कर्मचारी यांनी लेखी स्वाक्षरीत अर्ज केल्यावर व सोबत स्व साक्षांकित प्रमाणपत्र दिल्यावर शैक्षणिक अनुदान मंजुर करण्यात येत आहे.

◈



# ◈ उच्च शिक्षण पदव्युत्तर पदविका व पदवी प्रोत्साहन योजना ◈

**पो**लीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचे पत्र क्रमांक पोमसं/२८अ/४९३७/उच्च शिक्षण प्रो.यो./०२/२०१८, दि.१४/०२/२०१८ अन्वये पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचारी यांचे **मुलींना** पदव्युत्तर पदवी शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे या हेतूने विशेष स्कॉलरशिप योजना सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षापासुन लागू करण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत स्कॉलरशिप करिता शासनमान्य शिक्षण संस्थेतून पुर्ण केलेले पुढील अभ्यासक्रम विचारात घेतले जातील.

१.वैद्यकीय अभ्यासक्रम (M.D., M.S.)
२.अभियांत्रिकी (M.E., M.Tech.)
३.विधी अभ्यासक्रम (LLM)
४.व्यवसाय व्यवस्थापन (MBA,CA/CS/Cost Accountancy (From I.C.W.A.), M.C.A.)

-: वरील अभ्यासक्रमाच्या यशस्वी पुर्ततेनंतर फक्त मुलीस रु.२५,०००/- विशेष स्कॉलरशिप देण्यात येईल.



# ◈ उच्च शिक्षण अनुदान/कर्ज योजना ◈

**पो**लीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचे पत्र क्रमांक पोमसं/२८अ/४९३७/उच्च शिक्षण प्रो.यो./१३९/२०१६, दि.१९/०९/२०१६, दि.९.२.२०१७ अन्वये पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक व मंत्रालयीन लिपीक वर्ग यांचे पाल्यांना उच्च शिक्षण घेण्याचे प्रोत्साहन मिळावे म्हणुन खालील उच्च शिक्षणाकरिता या योजने अंतर्गत पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी खालील दोन प्रकारे आर्थिक मदत देण्यात येत आहे.

अ)खालील नमुद शिक्षण संस्थामध्ये **प्रथम प्रवेश घेतलेल्या** प्रत्येक पाल्यास एकावेळी रुपये २५०००/- इतकी अनुदान/स्कॉलरशिप म्हणुन देण्यात येईल.

१.भारतीय अभियांत्रिकी संस्था (IIT)
२.महाराष्ट्रतील किंवा देशांतर्गत कोणतेही वैद्यकीय महाविद्याविय जेथे अखिल भारतीय स्तरावर किंवा महाराष्ट्र राज्याच्या सी.ई.टी. मार्फत प्रवेश देण्यात येतो.
३.भारतीय प्रबंध संस्था (IIM),
४.सर्व नॅशनल लॉ स्कुल्स,
५.सर्व राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्था (NIIT)

वरिल शिक्षण संस्थासह बी.टेक, बीएएसएस, बीएचएमएस, बीसीए, एमसीए व त्यासमकक्ष शासनमान्य व्यवसाईक अभ्यासक्रम यासाठी वार्षिक टयुशन फी स्वरुपात भराव्या लागणाऱ्या फी एवढी रक्कम रुपये ५०,०००/- कर्ज स्वरुपात १२ मासिक हप्त्यांमध्ये परतफेड करण्याच्या अटीवर देण्यात येईल. कर्ज स्वरुपात घेतलेल्या रक्कमेची परतफेड केल्यानंतर संबंधीत पाल्याने त्या कोर्समध्ये गुणवत्ता प्राप्त केल्यास (शैक्षणिक सत्रात ६०टक्केपेखा जास्त गुण मिळविल्यास व पाल्यांना आवश्यकता भासल्यास) परत शैक्षणिक कर्ज म्हणुन त्याच अटिवर देण्यास पात्र राहतील.

तसेच मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परि.क्र.पोमसं/२८अ`/४९३७/उच्चशिक्षण-प्रो.यो/१३९/(१७)/२०१८,दि. १/१/२०१८ अन्वये वरिल संदर्भीय परिपत्रकात सुधारणा करुन खालील नमुद शिक्षण संस्थामध्ये प्रथम प्रवेश घेतलेल्या पाल्यास रुपये १,००,०००/- इतकी अनुदान/स्कॅारशिप म्हणुन देण्यात येईल.

१.भारतीय अभियंत्रिकी संस्था (IIT)
२.भारतातील कोणतेही वैद्यकिय महाविद्यालय (MBBS)
जेथे सामायिक प्रवेश परिक्षेद्वारे **प्रथम प्रवेश घेतला आहे.**

सदर रुपये १,००,०००/- अनुदानापैकी रुपये २५,०००/- इतकी रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल व उर्वरित रक्कम रुपये ७५,०००/- इतक्या रक्कमेची एका वर्षाची मुदत ठेव (FDR) प्रमाणपत्र तयार करुन संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात येईल. सदरची योजना ही सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासुन लागू आहे.

महाराष्ट्र पोलीस दलातील अनेक अधिकारी/कर्मचारी यांची मुले महाराष्ट्र पोलीसात तसेच इतर शासकीय सेवेमध्ये/खाजगी सेवेमध्ये नौकरी मिळवण्यासाठी प्रयत्न करत असतात. तथापि नौकरीच्या अपुऱ्या संधी, नौकरीसाठी पात्रतेचा अभाव, तीव्र स्पर्धा इत्यादी अडचणीमुळे प्रत्येकास नौकरी मिळेल असे नाही. रिणामी नौकरी न मिळाल्यास उद्योगधंदा सुरु करण्यासाठी आर्थिक स्तरावर पाठिंबा न मिळाल्यामुळे भांडवल उभे करणे कठीण जाते. त्यामुळे अशी मुले नौकरी व व्यवसाय यांच्या अभावामुळे त्यांच्या आयुष्यात हतोत्साहित होण्याचा मोठा दुष्परिणाम संभावतो. यामुळे अशा मुलांकरीता तसेच पोलीस कर्मचाऱ्यांच्या पती/पत्नी यांना नवीन उद्योगधंदा सुरु करण्यासाठी आर्थिक पाठबळ देण्याच्या अद्येशाने व पोलीस कर्मचारी यांचे कुटूंब आर्थिक दृष्टया सक्षम करण्यासाठी एकलव्य योजना-उद्योजकता व कौशल्य विकास ही योजना सुरु करण्यात येत आहे.

**योजनेचे नांव** :- यायोजनेस एकलव्य योजना- उद्योजकता व कौशल्य विकास असे संबोधण्यात येईल.

**योजनेचे उद्यीष्ट व लाभार्थी :-** महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई ते सहा.पो.उप निरीक्षक यांचे १८ वर्षावरिल पाल्यांना पोलीस कर्मचाऱ्यांच्या पती/पत्नी नवीन उद्योग सुरु करण्यासाठी अग्रीम तत्वावर परत फेडीच्या अटीवर आर्थिक भांडवल पुरविणे.

**योजनेचे स्वरुप :-** १.पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या १८वर्षावरील पाल्यांना, तसेच पोलीस कर्मचाऱ्यांच्या पती/पत्नीला नवीन लघुउद्योग सुरु करण्याकरीता परि.अ प्रमाणे विहीत नमुन्यात घटकप्रमुख यांचेकडे अर्ज सादर करावा.

२.घटकाचे मानव संसाधन पोलीस निरीक्षक पोलीस कल्याण यांनी अर्जाची पडताळणी करावी, ज्या जागेवर उद्योग सुरु करावयाचा आहे त्या जागेस भेट द्यावी, उद्योगाचे स्वरुप, जागेची परिषस्थिती व उद्योग सुरु करणाऱ्याची योग्यता याच्या अनुषंगाने लघुउद्योगाची व्यवहार्यता तपासावी. पोलीस आयुक्त/अधीक्षक/घटकप्रमुख यांनी पोलीस निरीक्षक, पोलीस कलयाण यांच्या अहवालाच्या अनुषंगाने अर्जदाराच्या पाल्यास, पती/पत्नीस अर्जदारासह मुलाखतीस बोलवावे व मुलाखतीनंतर प्रकरण निहाय मंजुरीचा निर्णय घ्यावा.

३.पात्र पाल्यांना, तसेच पोलीस कर्मचाऱ्यांच्या पती/पत्नीस अग्रीम दिल्यानंतर ६ महिने नंतर १८ मासिक हप्त्यात अग्रीमाची वसुली करण्यात यावी.

४.भाजी विक्रीचे दुकान, शिलाई व्यवसायाचे दुकान, किरकोळ वस्तु विक्रीचा व्यवसाय, पेपर विक्री, पर्यटन अभिकर्ता, झेरॉक्स व्यवसाय या व यासारख्या इतर व्यवसायाकरीता कमाल बिनव्याजी रु.१,००,०००/-पर्यन्त अग्रीम भांडवल मंजुर करण्यात येईल.

**लाभार्थीची पात्रता :- १** लाभार्थी हा पोलीस शिपाई ते सहा.पो.उप निर. यांचा पाल्य अथवा पत्नी/पती असावा.

{पुढील पानावर.....}

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१. विहीत नमुन्यातील अर्ज (परि.- अ प्रमाणे)
२. अर्जदार पोलीस कर्मचाऱ्याच्या वेतनातून दरमहा हप्ता वजाती करण्याचे संमतीपत्र (परि.- ड प्रमाणे)
३. अर्जदार ज्या जागेत उद्योग सुरु करणार, त्या जागेचे भाडेकरारनामा अथवा गुमास्ता लायसेन्स वा इतर अनुषंगिक कागदपत्रे.
४. अर्जदार या योजनेतुन मिळणाऱ्या भांडवल व्यतिरिक्त उद्योगास आवश्यक ते अधिक भांडवल कसे उभारणार त्याबाबतची माहिती.
५. ज्याच्यासाठी कर्ज घेणार आहे, त्या लाभार्थी पाल्य/पत्नीचे आधार कार्ड

**अटी व शर्ती :-**

१. या योजनेखाली कोणताही उद्योग हा पोलीस विभागाच्या जागेवर करता येणार नाही.
२. सदर योजनेचा लाभ घेवूनही ३ महिन्याच्या आत लघुउद्योग सुरु न केल्यास अथवा योजनेचा गैरवापर केल्याचे दिसुन आल्यास संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांकडुन १२% व्याजदराने सर्व रक्कम ४ मासिक हप्त्यात वसुल केली जाईल.



**महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत अंतर्गत अनुदानः-**

**पो**लीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या दर्जाचे पोलीस कर्मचारी तसेच वर्ग-ड, कनिष्ठ श्रेणी लिपीक ते प्रमुख लिपीक (कमाल मर्यादा ग्रेड पे रु.४२००/-पर्यन्त) जे पोलीस कल्याण निधीचे सदस्य आहेत, अश्या सर्वांना **महाराष्ट्र दर्शन** करण्यासाठी रजा प्रवास सवलत (गट वर्ष २०१७-२०२०) मंजुर करण्यात आलेली आहे, त्यांना पोलीस महासंचालक, महा.रा.मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२८अ/४९३७/पो.कर्म.महा.दर्शन/१८४(१६)/२०१७, दि.२८/०९/२०१७ अन्वये पोलीस कल्याण निधीतून रक्कम रुपये १,०००/-(अक्षरी-रुपये एक हजार फक्त) चे अनुदान प्रदान करण्याबाबत आदेश आहेत. सदर योजनेचा लाभ घेण्यास कार्यालयीन आदेशा व्यतिरिक्त स्वतंत्र अर्ज करण्याची गरज नाही. असे अनुदान प्राप्त करणाऱ्या एखाद्या कर्मचाऱ्यांनी रजा प्रवास सवलतीचा लाभ घेतला नाही तर त्याच्याकडून सदर रक्कम वेतनातून वसुल करुन परत पोलीस कल्याण निधीमध्ये भरणा करण्यात येईल.

**वैद्यकिय अग्रिम वाटप :-**

पोलीस कल्याण निधी नियमावली (सुधारित नियमावली-२०१५) नियम क्र.९ (२) (के) तसेच पोलीस महासंचालक कार्यालयाचे परि.क्र.२८अ`/ १९३७/मपोकनिबै/ ४३९/२००५, दि.१२/०२/२०१५ अन्वये पोलीस कल्याण निधी नियमांतील वित्तीय प्राधिकारानुसार अग्रिम देता येईल तसेच पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना कुटूंब आरोग्य योजने अंतर्गत होणाऱ्या आजाराशिवाय डॉक्टरांचे वैद्यकिय प्रमाणपत्र, कर्मचारी यांचे वेतन प्रमाणपत्रानुसार आजाराचे स्वरुप व आवश्यकता लक्षात घेवून वैद्यकिय अग्रिम मंजुर केले जाते. तथापि, एक अग्रिम /कर्जाची पुर्ण परतफेड झाल्याशिवाय दुसरे अग्रिम/कर्ज देया येणार नाही.

# अंत्यविधी व सानुग्रह अनुदान

**पो**लीस कल्याण निधी सुधारित नियमावली-२०१५व २०१९ नियम क्र.९ निधीचा विनियोग (१) (क) तसेच पोलीस महासंचालक कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक पोमसं/२८अ`/४९३७/मपोकनिबै/४३९/२००५, दि.३०/१२/२०१४ नुसार पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेल्या परंतु पोलीस विभागात सेवेत असतांना मृत पावलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे वारसदारास अंत्यविधीचा खर्च भागविण्यासाठी रु.१२,०००/- इतक्या रक्कमेचे अंत्यविधी अनुदान देण्यात येते.

**सानुग्रह अनुदान :-**

महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली (सुधारित नियमावली-२०१५व २०१९) नियम क्र.९ (१) (ड) नुसार सेवेत असतांना कर्तव्य बजावतांना किंवा, अन्यथा मरण पावलेल्या पोलीस निरीक्षक व त्याखालील दर्जाच्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटूंबियांना खालील दराप्रमाणे सानुग्रह अनुदान मंजुर करण्यात येते :-

१)पो.नि. ते सपोनि - रु.३०,०००/- (१९ वर्षाखालील प्रत्येक मुलास रु.१०००/-) अनुदान.
२)पोउपनि- रु.२५,०००/- (१९ वर्षाखालील प्रत्येक मुलास रु.१,०००/-)अनुदान
३)सपोउपनि ते पोशि- रु.२०,०००/- (१९ वर्षाखालील प्रत्येक मुलास रु.८००/-)अनुदान



# समुह वैयक्तिक अपघात विमा योजना

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१५/प्र.क्र.४५/विमा प्रशासन, दि.०४ फेब्रुवारी २०१६ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांकरिता राज्य शासना मार्फत राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना १९८२ राबविण्यात येत आहे.

पोलीस कर्मचारी यांचे अपघाती निधन झाल्यास त्यांच्या नामनिर्देशित वारसदारास विमा निधी म्हणून एक ठोक रक्कम देण्याची तरतुद आहे. परंतू, सदर योजनेमध्ये अपघातामुळे कायम स्वरुपाचे अपंगत्व /विकलांगता आल्यास व त्यामुळे सदर कर्मचाऱ्याच्या अपजिवीकेस धोका निर्माण झाल्यास त्याला ठोक रकमेच्या स्वरुपात नुकसान देण्याकरिता अपघात विमा योजना सुरु करण्याचा वरिल शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे.

प्रत्येक वर्षाच्या मार्च अखेर सेवानिवृत्तीसाठी ६ महिन्यांपेक्षा कमी कालावधी राहिलेल्या कर्मचाऱ्यांना सदर योजना लागू ठरणार नाही.

**समूह व्यक्तीगत अपघात विमा :-**

पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालयाद्वारे राज्य पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचे करिता समूह व्यक्तीगत अपघात विमा योजना दर वर्षी राबविण्यात येत असुन, अपघात विमा दावा करिता ओरिएन्टल इंश्योरंस कंपनी लि. पुणे या विमा कंपनी कार्यालया मार्फत विमा रु.१०,००,०००/- व जखमींना अपंगत्वाच्या प्रमाणानुसार उतरविण्यात आलेला आहे.

**महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचारी सॅलरी पॅकेज :-**

शासना कडून सर्व शासकीय कर्मचारी यांचे करिता महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचारी शासकीय सॅलरी पॅकेज या शासनाच्या योजनेत बऱ्याच बँकेचा समावेश करण्यात आलेला असुन, यात प्रामुख्याने सर्व नॅशनल बँक व शासन मान्य बँक मध्ये सदर योजनेत सॅलरी पॅकेज मध्ये वेतनाचे खाते काढल्यास व त्यात नियमीत वेतन जमा केल्यास राज्य शासकीय कर्मचारी यांचे वैयक्तीक अपघात विमा रु.३०,००,०००/- पर्यन्त अनुज्ञेय आहे. तसेच बँकेच्या खाते संबंधीत सर्व्हीसेस मोफत देण्यात येतात. महाराष्ट्र राज्य पोलीस तर्फे मुंबई पोलीस व राज्यातील काही जिल्हयातील पोलीस कार्यालयांनी एक्सीस बँकेशी सॅलरी पॅकेज संबंधी करार करुन अधिक विमा व इतर वित्तलब्धी सोयींचा लाभ घेण्यात येत आहेत. तसेच अश्या प्रकारचे लाभ मिळण्यासाठी नागपूर (ग्रामीण) कार्यालयाने एस.बी.आय. नागपूर यांचे कडे सॅलरी पॅकेज प्रमाणे सुविधा या घटकास देण्याची योजना सुरु केलेली आहे.

# पोलीस कल्याण निधीतुन शाळा प्रवेश अर्धेशुल्क वितरण

**पो**लीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र. पोमसं/२८अ/४९३७/अकोला(सैनिकी शाळा)/९०/०४, दि.१८/०२/२००८ अन्वये पार्थ सैनिकी शाळा व राजमाता जिजाऊ सैनिकी शाळेमध्ये आकारण्यात येणाऱ्या शुल्काच्या अर्धे शुल्क किंवा रु.७,५००/- या पैकी जे शुल्क कमी असेल ते शुल्क अनुदान म्हणुन संबंधीत घटक पोलीस कल्याण निधीतुन सदर सैनिकी शाळेमध्ये प्रवेश घेणाऱ्या पोलीस पाल्यांचा शैक्षणिक फी ची रक्कम परस्पर मंजुर करुन संबंधित शैक्षणिक संस्थेकडे पाठविण्याची निर्देशित केले आहे. त्याअनुषंगाने सैनिकी शाळेमध्ये आकारण्यात येणाऱ्या शुल्काच्या अर्धे शुल्क किंवा रु.७,५००/- यापैकी जे शुल्क कमी असेल ते शुल्क या योजनेद्वारे अनुदान म्हणून देता येईल.

.



# ◈ मानव संसाधन शाखे तर्फे समाधान मदत केंद्र/हेल्प लाईन ◈

◈

**पो**लीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र. पोमसं/२८/४९३७/क्र.वृ.प्र-४८-वी सभा-समाधान हेल्पलाईन/१४६/२०१६, दि.०६/०९/२०१६ अन्वये सर्व पोलीस घटक कार्यालयामध्ये प्रशासकीय कामकाजाची शिघ्रगतीने निर्गती व्हावी, यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालय मानव संसाधन शाखे तर्फे पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय कामकाज दरम्यान निर्माण होणाऱ्या अडिअडचणींचे निराकरण करणे व कामकाजात मदत देवून सहकार्य करणे तसेच इतर प्रकारच्या समस्यांचे दुरध्वनी वरुन त्यांच्या समस्या व तक्रारी जाणून घेवून आवश्यक मदत करण्यात येत आहे. त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांना कार्यालया पर्यन्त येवून आपली समस्या मांडण्याची आवश्यकता भासत नाही. त्यांचे समाधान मानव संसाधन हेल्प डेस्क द्वारे करण्यात येते.

◈

· **समाधान हेल्प-लाईन डेस्क मदत योजने मुळे होणारे फायदे :-**

१.कार्यालयीन कामकाजामध्ये अधिक पारदर्शकता निर्माण होत आहे.
२.तक्रारींचे वेळीच निराकरण करुन देण्यात येते.
३.अधिकारी/कर्मचारी यांचे परिश्रम व वेळेची बचत होते.
४.प्रकरण त्रुटी मुळे प्रलंबित राहिल्यास,त्रुटीची पुर्तता होते व असुन प्रकरण निकाली आहे.
५.प्रशासकीय कामकाजात निर्माण झालेल्या अडिचणींचे निराकरण करण्यासाठी सर्वांना सहकार्य मदत करण्यात येत आहे.

◈



◈

## पोलीस बॅन्ड :-

**पो**लीस नियमावली भाग-१, परिशिष्ट ५, नियम १० पोलीस बॅन्ड मधील नियम क्र.६ (अ) (ब) मध्ये खालील अटींचे अधिन राहून पोलीस बँड पोलीस अधिकारी/ कर्मचारी व इतर खाजगी व्यक्तीं यांना त्यांचे मागणीनुसार कार्यक्रमासाठी भाडयाने दिला जातो.

अ) कार्यक्रम नैतिक, कायदेशीर किंवा राजकीय दृष्टया आक्षेपार्ह नसावा.

ब) एकाच ठिकाणी (कार्यक्रमाचे ठिकाणी) राहुन बॅन्ड वाजविण्यात येते. पोलीस अधिकारी/ कर्मचारी तसेच खाजगी व्यक्ती यांना भाडेतत्वावर पुरवठा करण्याचे बॅन्डचे दर खालील प्रमाणे आहे :-

१) पोलीस अधिकारी/कर्मचारी :- १ ते ३ तासा करिता रु.४,०००/-
२) खाजगी व्यक्ती :- रु.८०००/- प्रति तास.

◈

## शासकीय वाहन भाडेतत्वावर पुरविणे :-

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक : वाहन २०१४/प्र.क्र.२३/१४/ विनियम, दि.३०/०५/२०१४ अन्वये पेट्रोल, डिझेल, सी.एन.जी. जर चालणाऱ्या सर्व शासकीय वाहनांच्या खाजगी वापरांसाठी रु.१२/- प्रति किलोमीटर या दराने वसुली करण्याबाबत नमुद केले आहे. शासकीय वाहनाच्या खाजगी वापरासाठीची कमाल मर्यादा प्रति महा ७०० किलोमीटर इतकी आहे. तथापि, अपवादात्मक बाबतीत सदर मर्यादा ओलांडल्यास ७०० किलोमीटरच्या पुढील अंतरासाठी रु.१८/- प्रति किलोमीटर या दराने वसुली करण्याचे नमुद केले आहे.

शासकीय वाहन खाजगी वापरात असतांना, त्यासाठी खोळंब्याचा दर प्रति तास रु.८/- व कमाल रु.८०/- प्रति दिवस इतका असेल.

◈

# ◈ व्यायाम शाळा ◈

**पो**लीस मुख्यालय नागपूर ग्रामीण येथे पोलीस कर्मचारी व त्यांचे कुटूंबियाकरिता तसेच खाजगी व्यक्ती करिता व्यायामशाळा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर व्यायामशाळे मध्ये विविध आधुनिक साहित्य असून यामध्ये प्रतिक्षण घेणाऱ्याकरिता खालील प्रमाणे दर आकारण्यात येत आहे.

मुख्यालय येथील पोलीस कल्याण निधी उपक्रम अंतर्गत **सुदृढ** व्यायाम शाळेच्या आधुनिकीकरण उदघाटन समारंभा दरम्याण दिलेल्या मौखीक आदेशान्वये व्यायाम शाळेचे खालील नमुद नविन दराप्रमाणे फी चीआकारणी दिनांक १ जुलै २०१९ पासुन सुरु करण्यात यावी.

| अनु.क्र. | सभासद | नोंदणी फी (रु.) | मासीक फी (दर महिणा) (रु.) | एकुण फी (प्रथम प्रवेशावर ची फी) (रु.) |
|---|---|---|---|---|
| १. | खाजगी व्यक्ती (विभागा बाहेरील) | ५०० | १००० | १५०० |
| २. | पोलीस कर्मचारी | ३०० | ५०० | ८०० |
| ३. | पोलीस कर्मचारी कुटूंब (शासनाच्या कुटूंब व्याखेतील सदस्य) | २०० | ३०० | ५०० |



# ◈ सदभावना विश्राम गृह ◈

**पो**लीस मुख्यालय नागपूर ग्रामीण येथे सदभावना विश्राम गृहाचे निर्माण करण्यात आले असुन, विभागातील वरिष्ठ अधिकारी हयांचे दौरा कार्यक्रमासाठी नागपूर येथे आगमन झाले तर त्यांना दौरा कालावधीत राहण्यासाठी व विश्राम करण्यासाठी मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी व घटक कल्याण निधी मधून विश्राम गृहाचे निर्माण करण्यात आले असुन, ते सुव्यवस्थित सुरु आहे.

पोलीस अधिकारी हे शासकीय कामाने वास्तव्यासाठी राहील्यास त्यांचे कडून नियमा नुसार भाडे शुल्क भरुन घेण्यात येते व सदरहू प्राप्त शुल्का मधून विश्राम गृहाचे देखभालीचा खर्च व इतर आवश्यक खर्च करण्यात येत असतो.



## पोलीस कल्याण निधी- पेट्रोल पंप (पो.स्टे.कळमेश्वर)

**पो**लीस कल्याण निधी द्वारे राबविल्या जाणाऱ्या योजनांना कार्यान्वित ठेवण्यासाठी निधीची मोठया प्रमाणात आवश्यकता भासत होती. त्या अनुषंगाने मध्यवर्ती कल्याण निधी व घटक कल्याण निधी उभारण्या द्वारे पेट्रोल पंपाचा उपक्रम पो.स्टे. कळमेश्वर परिसरात नुकताच सन-२०१९ पासुन सुरु करण्यात आलेला असुन,



# महिलांना विशेष पोषण आहार व सुदृढ बालिका अनुदान योजना

पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे कडिल परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/४९३७ /महिला पोलीस-विशेष अनुदान/३३(०२)/२०१८, दिनांक २३/०२/२०१८ चे नमुद प्रमाणे महिला पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक या पदावरील महिला पोलीसांच्या फक्त पहिल्या प्रसुतीच्या काळात तिचा व तिच्या होणा-या फक्त पहिली मुलगी बाळाच्या आरोग्याचा दर्जा वाढविण्याच्या हेतूने विशेष पोषण आहार घेता यावा. करीता या घटकाचे पोलीस कल्याण निधी मधून त्यांच्या गरोदरपणात विशेष पोषण आहार अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

१) गरोदर अवस्थेत महिला पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचे योग्य रितीने पोषण होण्यासाठी व महिला सक्षमीकरणाच्या पार्श्वभूमीवर महिला कर्मचा-यांना पहिल्या काळात रू.५,०००/- इतके **“विशेष पोषण आहार अनुदान”** गरोदर असल्या बाबत शासकिय डॉक्टरांचे वैद्यकिय प्रमाणपत्रा सहित अर्ज केल्यावर देण्यात येईल. (डॉक्टरांचे प्रमाणपत्राची **प्रमाणीत केलेली सुस्पष्ट छायांकित प्रत** अर्जासोबत सलग्न करावी.)

२) तसेच जन्मास आलेले पहिले अपत्य हि मुलगी असल्यास बेटी बचावच्या पार्श्वभूमीवर व मुलींचा जन्मदर वाढण्यास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने तिच्या पोषणासाठी देखील **“सुदृढ बालिका अनुदान”** म्हणून रू. ५,०००/- जन्म प्रमाणपत्र सहित अर्ज केल्यावर देण्यात येईल.

# ◈ महाराष्ट्र रजा नियम बाबत माहिती ◈

◈

१) **अर्जित रजा :-**

नियम : महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ नियम क्र.५० अन्वये अर्जित रजा मंजुर करण्यात येते. सदरची रजा दरवर्षी जानेवारी मध्ये १५ दिवस व जुलै मध्ये १५ दिवस अशी वर्षा करिता रजा खात्यावर जमा होते. त्याच प्रमाणे ३६५ दिवस कर्तव्यावर हजर राहील्यास एका वर्षात १५ दिवस अतिरिक्त रजा जमा होईल.

२) **३०/१५ किंवा १५/१५ अर्जित व समर्पित रजा :-**

नियम : महा.ना.से. रजा नियम १९८१ नियम क्र.५० व महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एलव्हीई-०२/प्र.क्र.५६४/पोल५ (ब) अन्वये, अर्जित / समर्पित रजा मंजुर करण्यात येते.

३) **समर्पित रजेचे रोखीकरण :-**

नियम : महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एलव्हिई-२००४/प्र.क्र.५६४/पोल ५(ब), दि.२७/०२/२००४ अन्वये, दरवर्षी आर्थिक वर्षाकरिता १५ दिवस अर्जीत रजा प्रत्यार्पित करण्यास अनुमती देण्यात येईल.

४) **परिवर्तीत रजा/अर्धवेतनी रजा (सिक रजा)**

महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ नियम क्र.६३ अन्वये परिवर्तीत रजा मंजुर करण्यासत येते. सदरची रजा दरवर्षी जानेवारी मध्ये १० दिवस व जुलै मध्ये १० दिवस अशी दरवर्षी रजा खात्यावर जमा होते.

५) **विनावेतन रजा (असाधारण रजा) :-**

नियम : महाराष्ट्र नागरी सेवा जमा नियम १९८१ नियम क्र.६३ अन्वये विनातेन रजा (असाधारण रजा ) मंजुर करण्यात येते. सदर कर्मचाऱ्याने कर्तव्यावर गैरहजर राहण्याची विनंती केल्यास त्यांना पुर्व परवानणगीने असाधारण रजा (विनावेतन रजा ) मंजुर करण्यात येते.

६) **प्रसुती रजा :-**

नियम : महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.अ.रजा-१४९०/प्र.क्र.८/०९/सेवा-६, दि.२४/८/२००९ अन्वये, ज्या महिला कर्मचाऱ्यांची सेवा एक वर्ष किंवा ३३ महिण्याची सेवा पूर्ण केल्यानंतर दोन अपत्यांपर्यन्त (१८०) दिवस विशेष प्रसुती रजा मंजुर करण्यात येते. सदरची रजा कोणत्याही रजा खाती वजा केली जात नाही.

◈

७) **बालसंगोपन रजा :-**
नियम : महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र.अरजा-१४९०/प्र.क्र.१२/०९/सेवा-९, दि.२८/७/१९९५ अन्वये, ज्या महिला कर्मचाऱ्यांची सेवा एक वर्ष किंवा ३३ महिण्यांची सेवा पुर्ण केल्यानंतर दोन अपत्यापर्यन्त (६०) दिवस बालसंगोपन रजा महिला कर्मचाऱ्याने मागणी केल्यास प्रसुती रजेला जोडून वैद्यकिय प्रमाणपत्र न सादर करता कमाल एक वर्षाच्या कालावधी पर्यन्त (६० दिवसांपर्यन्त परिवर्तीत किंव अर्जित रजा धरुन) मंजुर करण्यात येते.

८) **गर्भपात/गर्भस्त्राव रजा (विशेष रजा) :-**
नियम : महाराष्ट्र शासन वित्त विभाग विर्णय क्र. अ रजा-१४९०/प्र.क्र.१२/०९/सेवा-९, दि.२८/७/१९९५ अन्वये विशेष रजा देण्यात येते.

९) **विपशनेसाठी (विशेष रजा) :-**
शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना एकावेळी १४ दिवस परिवर्तीत रजा घेता येते. टिप-तीन वर्षांतून एकदा व संपूर्ण सेवा काळात सहा वेळा घेता येईल.

१०) **श्वान /वन्य प्राणी दंश (विशेष रजा) :-**
पोलीस नियमावली भाग-२ नियम मधील २७३(ड) नुसार २१ दिवस वैद्यकिय प्रमाणपत्र सादर केल्यास विशेष रजा मंजुर करण्यात येते.

११) **कृष्ठरोग/क्षयरोग/पक्षघात (विशेष रजा) :-**
नियम : महा.ना.सेवा नियम १९८१ परि.३ मधील नियम ११ व शा.निर्णय वित्त विभाग क्र. सेनिअ` १००१/सेवा-४/, दि.२/६/२००३अन्वये मनासे नियम क्र.१९८१ मधील नियम क्र.७९ परि.३ मधील ८(४) मधील तरतुदीनुसार एक वर्षापर्यन्त रजा मंजुर करण्यात येते.

१२) **गणवेश भत्ता :-**
नियम: पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/१८/ ३० /२०१५-१६/ गणवेश भत्ता/१२/२०१५, दि.२२/०६/२०१५ अन्वये दरवर्षी वित्तीय वर्षात पोलीस कर्मचारी यांना गणवेश भत्ता अनुदान रु.५१६७/- मंजुर करण्यात येते.

१३) **प्रोत्साहन भत्ता :-**
नियम : मा.उपसचिव महाराष्ट्र शासन गृह विभाग यांचे कडील पत्र क्र.पीडब्ल्युएफ- १२०४/ १४३/ प्र.क्र.२/पोल, दि.०६/११/२००६ अन्वये वित्तीय वर्षात पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना प्रतिमाह रु.२५०/- इतका प्रोत्साहन भत्ता मंजुर करुन वेतनातून प्रदान करण्यात येते.

## आकस्मिक अजारात समाविष्ट होणारे आजार :-

१. हृदय विकाराचा झटका/फुफ्फुसाचा झटका
२. अति रक्तदाब
३. धनुर्वात
४. घटसर्प
५. अपघात /आघात संलक्षण (हृदयाशी व रक्तवाहिनीशी संबंधीत)
६. गर्भपात
७. तिव्र उदर वेदना /आंत्रअवरोध
८. जोरदार रक्तस्त्राव
९. विषमज्वर
१०. गॅस्ट्रो एनट्रायटीस
११. निषवेतनावस्था
१२. मनाविकृतीची सुरुवात
१३. डोळयातील दृष्टीपटल सरकणे
१४. स्त्रीरोगशास्त्र आणि प्रसुतीशास्त्र संबंधित आकस्मिक आजार
१५. जननमुत्र आकस्मिक आजार
१६. वायुकोष
१७. **कान, नाक किंवा घसा यामध्ये विजातीय पदार्थ गेल्यामुळे निर्माण झालेले आकस्मिक आजार.**
१८. ज्यामध्ये तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक असते अशा जन्मजात असंगती.
१९. ब्रेनटयुमर
२०. भाजने
२१. इप्लिप्सी
२२. ॲक्युट ग्लुकॉमा
२३. स्पॅनलस्कॉड संबंधात आकस्मिक आजार
२४. उष्माघात
२५. रक्तासंबंधीत आजार
२६. प्राणी चावल्यामुळे होणारी विषबाधा
२७. रसायनामुळे होणारी विषबाधा(५गंभीर आजारांचा समावेश)
२८. हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे
२९. हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया
३०. ॲंजियोप्लास्टी शस्त्रक्रिया
३१. मुत्रपिंड प्रतिरोपण कर्करोग
३२. कोरोना (कोव्हीड-१९) आजाराचा समावेश आधिपासुन आहेच.

**मानव संसाधन शाखा- मदत व समाधान केंद्र द्वारे सुचना :-**

महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेअंतर्गत पॅनलवर असलेले हॉस्पीटल मध्ये उपचार घ्यावयाचे असल्यास खालील प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे :-

१.उपचाराकरिता पॅनलवरील हॉस्पीटल मध्ये भरती/अॅडमीट झाल्यानंतर तात्काळ आजाराबाबत डॉक्टरचे प्रमाणपत्र व म.रा. म.पो.कु.आरोग्य योजनेचे ओळखपत्र, अर्ज, आधार कार्ड क्रमांक , राशन कार्ड ज्याचे उपचार करावयाचे आहे त्याचे २ पासपोर्ट साईज फोटोसह पोलीस अधिक्षक कार्यालय मानव संसाधन शाखा येथे २४ तासाच्या आंत सादर करणे आवश्यक आहे. सदरचे कागदपत्रे नसल्यास पो.अ. कार्यालय मानव संसाधन शाखे कडून NOC दिल्या जाणार नाही. तसेच अधि/कर्मचारी या व्यतिरिक्त पत्नी किंवा कुटूंबातील व्यक्तीचा म.पो.कु.आ. अंतर्गत उपचार करावयाचा असल्यास त्यांच्या कर्मचाऱ्यावर अवलंबुन असल्याबाबत व नौकरीत दुसरे कोणीही नसल्याबाबतचे प्रमाणपत्र कर्मचाऱ्यांनी या कार्यालयात इतर कागदपत्रे दयावयाचे आहे.

२.पोलीस अधिक्षक कार्यालया मार्फत देण्यात येत असलेले नाहरकत प्रमाणपत्र NOC तात्काळ अॅडमीट झालेल्या दवाखाण्यात सादर केली जाते व ४८ तासांच्या आंत पोलीस महासंचालक कार्यालय महाराष्ट्र राज्य, कार्यालय मुंबई येथे सादर करणे अनिवार्य आहे.

३.संबधित आजार (अपरोल) बाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार पोलीस महासंचालक कार्यालय महाराष्ट्र राज्य, कार्यालय मुंबई यांना आहे.

४.ज्यांनी कुटूंब आरोग्य योजनेचे कार्ड काढले नाही त्या अधि/कर्म. यांनी कुटूंब आरोग्य योजनेचे ओळखपत्र मिळविण्याकरीता फार्म भरुन पाठवावा यापुर्वी ज्यांनी कार्ड काढलेले आहे किंवा जुने कार्ड आहे त्यांनी फार्म भरुन पाठवू नये स्वत:चे कुटूंब आरोग्य योजनेचे कार्ड आहेत परंतु पाल्याचे काढावयाचे असल्यास प्रत्येकी दोन फोटो ज्यांचे कार्ड आहे त्यांचे त्या कार्डचा नंबर व आधार कार्डचा नंबर भरुन नमुद करुन पाठवावे.

टिप-पॅनलवर असलेले रुग्णालयाचे नांव व दुरध्वनी क्रमांक हे www.mahapolice.gov.in वर देण्यात आलेले आहे.

◈

# चित्रांगण

## वेलफेअर पेट्रोल पंप कळमेश्वर










## सदभावना विश्रामगृह व व्यायाम शाखा

















# महाराष्ट्र राज्य पोलीस कल्याण निधी योजना

***सुचना :-***

**सदर पुस्तीका व पुस्तीकेचे प्रकाशनाचे सर्वाधिकार कार्यालय, पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) चे असुन, पुस्तीका आस्थापनेवरील पोलीस कल्याण निधीच्या सदस्यां करिता मर्यादित आहे. छापीव सामग्री बाबत कोणतेही आक्षेप अस्विकार्य राहतील. तसेच संबंधीत बाबत कोणतेही प्रकारचा पत्रव्यवहार करण्यात येणार नाहीत. तसेच पुस्तीकेतील कोणत्याही माहितीचा तथा पुस्तीकेची छायांकन प्रत काढून त्याचा कोणत्याही सोशल मिडीयावर/साईटवर दुरुपयोग करु नये.*

@copy right2020* @cybercrimelaw*